RNI No. MAHBIL/2009/36619




# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग एक—कोकण विभागीय पुरवणी

वर्ष १२, अंक ७२] सोमवार, ऑगस्ट ३१, २०२६/भाद्रपद ९, शके १९४८ [पृष्ठे ४ , किंमत : रुपये ११.००

**असाधारण क्रमांक १०८**

**प्राधिकृत प्रकाशन**

**जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी, सिंधुदुर्ग यांजकडून**

**वाचले —** १. शासन निर्णय क्रमांक प्राफेब-२०१०-प्र.क्र.११२(भाग-३)-म-१०, दिनांक २५ मे २०१७.

२. मा. प्रधान सचिव, महसूल, नोंदणी व मुद्रांक शुल्क महसूल व वन विभाग मंत्रालय, मुंबई यांचे पत्र क्र. प्राफेब-२०१०-प्र. क्र. ११२(भाग-३)-म-१०, दिनांक १-६-२०१७.

**प्रारुप अधिसूचना**

क्रमांक डेस्क-८/मशा-५/कावि- १९३, १९६/०८/२०२६.— ज्याअर्थी, महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक प्राफेब-२०१०-प्र.क्र११२(भाग-३)-म-१०, दिनांक २५ मे, २०१७ अन्वये राज्यातील वाढती लोकसंख्या वाढते नागरीकरण या अनुषंगाने क्षेत्रिय महसूल यंत्रणेच्या कामात झालेली वाढ विचारात घेता राज्यात एकूण ३,१६५ नवीन वाढीव तलाठी साझे व ६ तलाठी साझ्याने १ महसूल मंडळ या तत्वाप्रमाणे सदर वाढीव तलाठी साझासाठी ५२८ नवीन महसूल मंडळे स्थापन करण्यास शासनाने मान्यता दिलेली आहे;

ज्याअर्थी, मा. विभागीय आयुक्त,कोकण विभाग यांचेकडून दि.२५/०५/२०१७ व दि. २४/०७/२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये तलाठी साझा पुनर्रचना करून सिंधुदुर्ग जिल्ह्यात यापूर्वी असलेल्या २३६ तलाठी साझामध्ये नव्याने ९९ साझा निर्माण करून एकूण ३३५ तलाठी साझा निर्माण करण्यात आलेले आहेत. मा. प्रधान सचिव महसूल,नोंदणी मुद्रांक शुल्क महसूल व वन विभाग, मंत्रालय मुंबई यांचे पत्र क्र. प्राफेब -२०१०-प्र.क्र११२(भाग-३)-म-१०, दिनांक १ जून २०१७ अन्वये साझाची फोड/पुनर्रचना करण्याकरिता उपविभागनिहाय उपविभागीय अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली तहसीलदार यांची समिती गठीत करून त्यांचेकडून सिंधुदुर्ग जिल्ह्यातील उपविभागनिहाय होणाऱ्या साझाची फोड/पुनर्रचनाबाबत साझांची निश्‍चिती करण्यात आली आहे;

ज्याअर्थी, उपविभागीय अधिकारी, कुडाळ यांनी मौजे गांधीनगर हे महसुली गाव पाट साझास व मौजे आंबेरी हे गाव वाडोस साझास जोडणेबाबत, तसेच तहसीलदार मालवण यांनी आमवणे साझा किर्लोस साझास जोडणे ग्रामस्थांच्या सोयीचे असलेबाबतचा तलाठी साझा पुनर्रचनेबाबत अहवाल सादर केलेला आहे;

ज्याअर्थी, मा. श्री. अनुप कुमार यांचे अध्यक्षतेखाली गठीत झालेल्या समितीच्या तलाठी साझांचे पुनर्रचना करण्याबाबत शिफारसी मधील मुद्दा क्र. ६.१.३ मध्ये "प्रत्येक तलाठी साझाचे मुख्यालयापासून त्या साझ्यास संलग्न करण्यात येणारे गाव १० कि. मी पेक्षा जास्त अंतरावर शक्यतो नसावे. उपलब्ध दळण-वळण व्यवस्थेचा विचार करून त्याबाबतचा निर्णय संबंधित जिल्हाधिकारी यांनी घ्यावा" असे नमूद आहे;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम ४ पोट-कलम (२) नुसार तलाठी साझा निर्मिती किंवा फेरबदल करण्याचा अधिकार जिल्हाधिकारी यांना आहे.

**त्याअर्थी, महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम ४ पोट-कलम (२) च्या खाली परंतू राज्य शासनास असलेल्या शक्ती जिल्हाधिकारी यांना प्रदान करण्यात आलेल्या आहेत. त्याचा वापर करून मी, तृप्ती धोडमिसे, जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कुडाळ तालुक्यातील खालील अनुसूचीतील :—**

**(१) अ. क्र. २ चे तुळसुली कर्याद नारूर साझा मधील आंबेरी हे गाव पूर्वीच्या अ.क्र.१ चे वाडोस साझामधील स्तंभ क्र.७ मध्ये समाविष्ट करून साझा पूर्ववत करीत आहे.**

**(२) अ.क्र. ३ चे हुमरमळा साझा मधील गांधीनगर हे गाव पूर्वीच्या अ.क्र. ४ चे पाट साझामधील स्तंभ क्र. ७ मध्ये समाविष्ट करून साझा पूर्ववत करीत आहे.**

**(३) अ.क्र. ५ चे असरोंडी साझा मधील आमवणे हे गाव पूर्वीच्या अ.क्र. ६ चे किर्लोस साझामधील स्तंभ क्र. ७ मध्ये समाविष्ट करून साझा पूर्ववत करीत आहे.**

**तसेच सर्व व्यक्तींच्या माहितीसाठी ही अधिसूचना उपविभागीय अधिकारी कार्यालय, तहसीलदार कार्यालय, तलाठी साझा व ग्रामपंचायतचे नोटीस बोर्डवर लावून प्रसिध्द करण्यात येत आहे. सदर अधिसूचनेचा परिणाम होण्याचा संभव असलेल्या सर्व व्यक्तींच्या माहीतीसाठी याद्वारे प्रसिध्द करणेत येत आहे की, सदर प्रारूप अधिसूचनेबाबत ज्यांना कोणाला हरकत किंवा सूचना करावयाची असेल ती दिनांक १५ सप्टेंबर २०२६ पर्यंत लेखी स्वरूपात उपविभागीय अधिकारी, कुडाळ किंवा तहसीलदार कुडाळ यांचे कार्यालयात सादर करावी. उपरोक्त तारखेपूर्वी प्राप्त हरकती किंवा सूचना विचारात घेतल्या जातील.**

अनुसूची

| अ.क्र. | सद्यस्थिती | | | पुनर्रचनेप्रमाणे | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | मंडळाचे नाव | साझाचे नाव | साझातील समाविष्ट गावांची नावे | मंडळाचे नाव | साझाचे नाव | साझातील समाविष्ट गावांची नावे |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | माणगाव | वाडोस | वाडोस ,कालेली, कांदुळी, मोरे | माणगाव | वाडोस | वाडोस ,कालेली, कांदुळी, मोरे, **आंबेरी** |
| २ | गोठोस | तुळसुली कर्याद नारूर | तुळसुली कर्याद नारूर, निवजे, **आंबेरी** | गोठोस | तुळसुली कर्याद नारूर | तुळसुली कर्याद नारूर, निवजे |
| ३ | मडगांव | हुमरमळा | हुमरमळा, **गांधीनगर** | मडगांव | हुमरमळा | हुमरमळा |
| ४ | मडगांव | पाट | पाट | मडगांव | पाट | पाट, **गांधीनगर** |
| ५ | पोईप | असरोंडी | असरोंडी, **आमवणे** | पोईप | असरोंडी | असरोंडी |
| ६ | पोईप | किर्लोस | किर्लोस, शिरवंडे | पोईप | किर्लोस | किर्लोस, शिरवंडे, **आमवणे** |

सिंधुदुर्ग,
दिनांक २७ ऑगस्ट, २०२६.

**तृप्ती धोडमिसे** (भा. प्र. से.),
जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग.

## जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी, सिंधुदुर्ग यांजकडून

**वाचलेः—** १. शासन निर्णय क्रमांक प्राफेब-२०१०-प्र.क्र.११२(भाग-३)-म-१०, दिनांक २५ मे २०१७.

२. मा. प्रधान सचिव, महसूल, नोंदणी व मुद्रांक शुल्क महसूल व वन विभाग मंत्रालय, मुंबई यांचे पत्र क्र. प्राफेब-२०१०-प्र.क्र.११२(भाग-३)-म-१०, दिनांक १-६-२०१७.

### प्रारुप अधिसूचना

क्रमांक डेस्क-८/मशा-५/कावि- १९३, ९१६/०८/२०२६.— ज्याअर्थी, महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक प्राफेब-२०१०-प्र.क्र११२(भाग-३)-म-१०, दिनांक २५ मे, २०१७ अन्वये राज्यातील वाढती लोकसंख्या वाढते नागरीकरण या अनुषंगाने क्षेत्रिय महसूल यंत्रणेच्या कामात झालेली वाढ विचारात घेता राज्यात एकूण ३,१६५ नवीन वाढीव तलाठी साझे व ६ तलाठी साझ्याने १ महसूल मंडळ या तत्वाप्रमाणे सदर वाढीव तलाठी साझासाठी ५२८ नविन महसूल मंडळे स्थापन करण्यास शासनाने मान्यता दिलेली आहे;

ज्याअर्थी, मा. विभागीय आयुक्त,कोकण विभाग यांचेकडून दि.२५/०५/२०१७ व दि. २४/०७/२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये महसूल मंडळ पुनर्रचना करून सिंधुदुर्ग जिल्ह्यात यापूर्वी असलेल्या २३६ तलाठी साझामध्ये नव्याने ९९ साझा निर्माण करून एकूण ३३५ तलाठी साझा व ५७ महसूल मंडळे निर्माण करण्यात आलेले आहेत. मा. प्रधान सचिव महसूल,नोंदणी मुद्रांक शुल्क महसूल व वन विभाग, मंत्रालय मुंबई यांचे पत्र क्र. प्राफेब -२०१०-प्र.क्र११२(भाग-३)-म-१०, दिनांक १ जून २०१७ अन्वये साझाची फोड/पुनर्रचना करण्याकरिता उपविभागनिहाय उपविभागीय अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली तहसीलदार यांची समिती गठीत करून त्यांचेकडून सिंधुदुर्ग जिल्ह्यातील उपविभागनिहाय होणाऱ्या महसूल मंडळांची फोड/पुनर्रचनाबाबत निश्चिती करण्यात आली आहे;

ज्याअर्थी, उपविभागीय अधिकारी, कुडाळ यांनी मौजे आंबेरी हे गाव वाडोस साझास जोडणे ग्रामस्थांच्या सोयीचे असलेबाबतचा तलाठी साझा पुनर्रचनेबाबत अहवाल सादर केलेला आहे. त्याअनुषंगाने आंबेरी हे गाव नवनिर्मित तुळसुली कर्याद नारुर साझाचे मंडळ गोठोस असून सदर आंबेरी गाव वाडोस साझास जोडणेकरीता माणगाव महसूली मंडळात समाविष्ट करणे योग्य आहे;

ज्याअर्थी, मा. श्री. अनुप कुमार यांचे अध्यक्षतेखाली गठीत झालेल्या समितीच्या महसूली मंडळांची पुनर्रचना करण्याबाबत शिफारसी मधील मुद्दा क्र. ६.१.३ मध्ये "प्रत्येक तलाठी साझाचे मुख्यालयापासून त्या साझ्यास संलग्न करण्यात येणारे गाव १० कि. मी पेक्षा जास्त अंतरावर शक्यतो नसावे. उपलब्ध दळण-वळण व्यवस्थेचा विचार करून त्याबाबतचा निर्णय संबंधित जिल्हाधिकारी यांनी घ्यावा" असे नमूद आहे;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम ४ पोट-कलम (२) नुसार महसूली मंडळाची निर्मिती किंवा फेरबदल करण्याचा अधिकार जिल्हाधिकारी यांना आहे.

**त्याअर्थी, महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम ४ पोट-कलम (२) च्या खाली परंतू राज्य शासनास असलेल्या शक्ती जिल्हाधिकारी यांना प्रदान करण्यात आलेल्या आहेत. त्याचा वापर करून मी, तृप्ती धोडमिसे, जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कुडाळ तालुक्यातील खालील अनुसूचीतील :—**

**(१) अ.क्र.२ चे तुळसुली कर्याद नारूर साझा मधील आंबेरी हे गाव पूर्वीच्या अ.क्र.१ चे वाडोस साझामधील स्तंभ क्र.७ मध्ये समाविष्ट करण्याकरीता सदर गावचे महसूल मंडळ गोठोस मधून माणगाव महसूली मंडळात समाविष्ट करण्यात येत आहे.**

**तसेच सर्व व्यक्तींच्या माहितीसाठी ही अधिसूचना उपविभागीय अधिकारी कार्यालय, तहसीलदार कार्यालय, तलाठी साझा व ग्रामपंचायतचे नोटीस बोर्डवर लावून प्रसिध्द करण्यात येत आहे. सदर अधिसूचनेचा परिणाम होण्याचा संभव असलेल्या सर्व व्यक्तींच्या माहितीसाठी याद्वारे प्रसिध्द करणेत येत आहे की, सदर प्रारूप अधिसूचनेबाबत ज्यांना कोणाला हरकत किंवा सूचना करावयाची असेल ती दिनांक १५ सप्टेंबर २०२६ पर्यंत लेखी स्वरूपात उपविभागीय अधिकारी, कुडाळ किंवा तहसीलदार कुडाळ यांचे कार्यालयात सादर करावी. उपरोक्त तारखेपूर्वी प्राप्त हरकती किंवा सूचना विचारात घेतल्या जातील.**

## अनुसूची

| अ.क्र. | सद्यस्थिती | | | पुनर्रचनेप्रमाणे | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | मंडळाचे नाव | साझाचे नाव | साझातील समाविष्ट गावांची नावे | मंडळाचे नाव | साझाचे नाव | साझातील समाविष्ट गावांची नावे |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | **माणगाव** | वाडोस | वाडोस ,कालेली, कांदुळी, मोरे | **माणगाव** | वाडोस | वाडोस ,कालेली, कांदुळी, मोरे, **आंबेरी** |
| | | माणगांव | माणगांव, बेनगांव, तळीगांव | | माणगांव | माणगांव, बेनगांव, तळीगांव |
| | | खुटवळवाडी | खुटवळवाडी, खोचरेवाडी | | खुटवळवाडी | खुटवळवाडी, खोचरेवाडी |
| | | घानवळे | घानवळे, नमसपूर | | घानवळे | घानवळे, नमसपूर |
| | | नमसगांव | नमसगांव, नानेली | | नमसगांव | नमसगांव, नानेली |
| | | कट्टागांव | कट्टागांव, भटगांव, ढोलकरवाडी | | कट्टागांव | कट्टागांव, भटगांव, ढोलकरवाडी |
| २ | **गोठोस** | तुळसुली कर्याद नारूर | तुळसुली कर्याद नारूर,निवजे, **आंबेरी** | **गोठोस** | तुळसुली कर्याद नारूर | तुळसुली कर्याद नारूर, निवजे |
| | | गोठोस | गोठोस, नारुर क. नारुर | | गोठोस | गोठोस, नारुर क. नारुर |
| | | शिवापूर | शिवापूर | | शिवापूर | शिवापूर |
| | | केरवडे क. नारुर | केरवडे क. नारुर, पुळास, निळेली | | केरवडे क. नारुर | केरवडे क. नारुर, पुळास, निळेली |
| | | वसोली | वसोली, आंजिवडे, साकिर्डे, उपवडे | | वसोली | वसोली, आंजिवडे, साकिर्डे, उपवडे |
| | | हिर्लोक | हिर्लोक, गिरगांव, कुसगांव, किनळोस | | हिर्लोक | हिर्लोक, गिरगांव, कुसगांव, किनळोस |
| | | नेरुर क. नारुर | नेरुर क. नारुर, चाफेली | | नेरुर क. नारुर | नेरुर क. नारुर, चाफेली |

सिंधुदुर्ग,
दिनांक २७ ऑगस्ट, २०२६.

**तृप्ती धोडमिसे** (भा.प्र.से.),
जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR.